एनपीसीआईएल
NPCIL



कर्करोग
Cancer

कॅन्सर एक दृष्टिक्षेप १

Cancer 1

तोंडाचा कर्करोग ३

Mouth Cancer 3

स्तनाचा कर्करोग ५

Breast Cancer 5

वैज्ञानिक तथ्य

विकिरणांचा वनस्पतींवर परिणाम ७

Scientific Facts

Impact of Radiation on Plants 7

कॅन्सर - एक दृष्टिक्षेप

कॅन्सर हा रोग आज आपल्या पुढे असलेल्या प्रमुख मुद्यांपैकी एक आहे. कॅन्सर हा रुग्णांच्या फक्त आरोग्यावरच नाही तर त्यांच्या मानसिक, सामाजिक व आर्थिक स्थितीवर सुध्दा प्रभाव करतो. मागच्या दशकात कॅन्सरच्या प्रमाणात निरंतर वाढ झाली आहे. खर तर वैद्यकिय विशेषतज्ञांनी कॅन्सरला गेल्या दशकातील स्वास्थ विकारांपैकी ह्दय विकारांच्या खालोखाल असे दुसरे स्थान दिले आहे. असा अनुमान लावला जातो की 2030 वर्षापर्यंत दरवर्षी सुमारे 2 ते 2.5 कोटी नवीन कॅन्सर रुग्ण आढळून येतील आणि या रोगामुळे 1 ते 1.5 कोटी वार्षिक मृत्यु होतील. आज आरोग्य शिक्षणामुळे कॅन्सरबद्दलची जागृकता वाढते आहे. तरीही या रोगाबद्दल कित्येक गैरसमजुती आणि चुकीच्या कल्पना समाजात आहेत.

कॅन्सर म्हणजे काय ?

कॅन्सरच्या उद्भवण्यामागे काही विशिष्ट 'जीन' (अनुवंशिक सुक्ष्मरचना) मध्ये आलेले परिवर्तन असते. आपल्या शरीरातल्या कोशिका एका नियमीत तऱ्हेने वाढत – मरत असतात. या नियमीत चक्रात काही कारणे अडथळा आणू शकतात, ती म्हणजे शरीरातील दोषी 'जीन' अथवा शरीराच्या बाहेर असलेले कर्मरोगजन्य पदार्थ (उदा. तंबाखू) एकदा ही सुरळीत रचना बिघडली तर, या रितीने परिवर्तित कोशिका जास्त गतीने वाढायला लागतात आणि कॅन्सर निर्माण होतो. एकदा कर्करोग उद्भव झाला तर ज्याप्रमाणे वाळवी लाकडाला पोखरुन काढते त्याचप्रमाणे कर्मरोग हा आपल्या शरीराला आतून पोखरुन काढतो.

कॅन्सरची कारणे :

कॅन्सरला अनेक गोष्टी कारणीभूत आहेत. निश्चितपणे माहीत असलेली कारणे पुढीलप्रमाणे आहेत.

1. तंबाखु आणि मद्यपान सगळ्यात महत्वाचे कारण म्हणजे तंबाखु, विडी, सिगारेट, गुटखा इत्यादींचे सेवन, तंबाखुमुळे जे कॅन्सर होऊ शकतात ते आहेत : –
   तोंडाचे, घशाचे, अन्ननलिकेचे, फुफ्फुस आणि मुत्राशयाचे अत्याधिक दारु पिण्याने सुध्दा काही कॅन्सर होतात जसे :– तोंड, घसा, अन्ननलिका आणि लिव्हर यांचे. तंबाखु आणि दारु यांचे जर एकत्र सेवन जास्त वेळापर्यंत चालले तर कॅन्सरचा धोका जास्त पटीने वाढतो.

2. विकिरण / क्ष – किरण :–
   विकिरण अर्थात धोकादायक किरणे यांच्या अधिक प्रभावाने काही अंगांचे कॅन्सर होऊ शकतात, उदा. थायरॉईड ग्रंथी रक्ताचे कॅन्सर, पोटाचे कॅन्सर.

3. वायरस :–
   काही वायरस कॅन्सर घडवु शकतात, उदा. हेपाटायटीस बी व सी, एच.पी. व्ही. इत्यादी.

4. पारिवारिक पृष्ठभूमि :–
   फक्त सुमारे 20% कॅन्सर अनुवांशिक असतात. परंतु एखाद्या असा अनुवांशिक दोषपुर्ण 'जीव' असेल, तर
   कॅन्सर होणारच अशी खात्री नाही. कॅन्सर हे हात लावल्याने किंवा एकत्र राहण्याने पसरत नाही, म्हणजेच की कॅन्सर संसर्गजन्य नाही.
   तसेच वर सांगितल्याप्रमाणे अधिकाअधिक कॅन्सर आई वडिलांपासून मुलांपर्यंत पोहोचत नाही.

कॅन्सरचे प्रतिबंध कसे ?

जर काही काळजी घेतली गेली तर बरेचशे कॅन्सर थांबवले जाऊ शकतात
उदा.

- तंबाखुचे सेवन टाळणे
- व्यवस्थित आहार आणि नियमित व्यायाम
- मद्यपान संयम

कॅन्सर प्रतिबंध करण्यासाठी कॅन्सर अनुवीक्षण ही एक प्रकारची प्रक्रिया आहे. कॅन्सर अनुवीक्षण; म्हणजे सामान्य जनतेत केले गेलेल्या तपासण्या जेणेकरुन लपलेले किंवा नवीन लहान कॅन्सर आढळून येतील. आपल्या जवळ कुठेक जर कॅन्सर अनुवीक्षण; क्रार्यक्रम होत असेल तर त्यात अवश्य भाग घ्यावा.

Cancer

Disease of cancer is one of the major issues confronting us today. Apart from its obvious physical manifestation, this disease has a telling impact on its victims psychological, social and economical condition. Last decade has witnessed a sustained increase in number of cancer cases. Medical experts place cancer at second place, only next to heart diseases in the list of major health concerns in last decade. According to an estimate by the year 2030, between 2 to 2.5 cr cancer cases are expected to be detected annually which would claim 1 to 1.5 crore deaths annually. Thanks to health education, awareness about this disease has increased today. However there are several myths and misunderstandings associated with this disease.

What is cancer?

Outbreak of cancer is due to transformation in specific genes (Hereditary genetic composition) found in human body. Cells in human body, develop, die and are replaced regularly. This natural cycle can be disturbed by certain internal causes like faulty genes or external causes outside the human body like exposure to carcinogenic substances (eg. Tobacco). Once this cycle is disturbed, the developed cells grow at a faster rate giving rise to cancer. Outbreak of cancer cells corrodes the human body internally exactly like termites damage wooden furniture.

Causes of cancer:

There are several causes of cancer. Known amongst them are as follows:

a. Tobacco & alcohol.

The use of tobacco in any forms like cigarettes, Gutkha, chewing, bidis etc is the major cause of cancer. Use of tobacco can lead to several forms of cancer like mouth, throat, Oesophagus, lungs and urinary bladder. Excessive use of alcohol also results in some forms of cancer like mouth, throat, oesophagus and liver. Prolonged and combined abuse of tobacco and alcohol multiplies the chances of cancer manifold.

b. Radioactive rays and X rays.

Prolonged exposure to harm ful radioactive rays can result in some forms of cancer like thyroid cancer, blood cancer and stomach cancer.

c. Virus.

Some virus like Hepatitis B & C, HPV etc., can cause cancer.

d. Family history.

Only 20 % of the cancers are caused by hereditary reasons. Even if someone has inherited faulty genes, it does not imply that the person concerned is sure to have cancer in his life time. Cancer does not spread by touching or socializing with the infected person. It is not a contagious disease. Similarly as confirmed earlier, in vast majority, cancer is not inherited from parents by their children.

How to avoid cancer?

Most types of cancers can be avoided by following certain precautions for eg.

a. Avoiding use of tobacco.
b. Proper diet and regular exercise.
c. Alcohol in moderation.

Cancer Screening i.e check up is a kind of preventive measure against this disease. Cancer screening is a public medical check up designed to detect smaller or newer varieties of cancer. Participate in these activities whenever they are organized in your locality.

कॅन्सरची धोक्याची लक्षणे

जर आपणास खालीलपैकी कोणतीही लक्षणे आहेत तर त्वरीत आपल्या डॉक्टरांशी संपर्क करा.

- निरंतर खोकला येणे
- शरीराच्या कोणत्याही भागात गाठ येणे विशेषतः स्तन, मान
- आवाजात एकाएक झालेला बदल.
- एकाएक विनाकरण वजन कमी होणे
- शौच सवर्यीमध्ये झालेला बदल
- रक्तस्त्राव
- तोंडात अधिक काळापासून असलेले छाले/ घाव

ही लक्षणे कॅन्सरची असू शकतात व ती आढळल्यास घाबरु नये, तर त्वरीत वैद्यकिय संपर्क साधावा.

कॅन्सर विशेषतज्ञांकडे कधी जावे

जर आपणास वरील सांगितलेली लक्षणे असतील, तर आपण शंका निवारण्यासाठी कॅन्सर विशेषतज्ञांकडे जाऊ शकता, किंवा आपल्या फॅमिली डॉक्टरांचा सल्ला घ्या.

कॅन्सरचे उपचार

पूर्वी कॅन्सरवर ऑपरेशन हाच प्रमुख उपचार होता. आधुनिक वैद्यकिय प्रगती झाल्याने आज उपचारासाठी आणखी पर्याय आले आहेत, सांगायचे झाले तरे केमोथेरपी (कॅन्सरची औषधे) आणि रेडियोथेरपी (क्ष किरणांनी उपचार) ही दोन्ही साधने बरीच वर्षांपासून आहेत, तरी यांच्यात सतत सुधारणा आणि विकास होतो आहे. काही परिस्थितीत शस्त्रक्रिया, रेडियोथेरपी व केमोथेरपी यांचा संयुक्त वापर करावा लागतो. विज्ञानाच्या सतत प्रगतिने आज हे सर्व पर्याय कमी त्रासदायक झालेले आहेत व अधिकतर रुग्ण हे उपचार सहन करु शकतात. आजची केमोथेरपी किंवा रेडियोथेरपी आधीपेक्षा कॅन्सरवर अधिक प्रभाव करणारी आहेत. कॅन्सरचे निदान आधी झाल्यास त्याचा उपचार थोडक्यात आटोपणारा, स्वस्त, कमी त्रासदायक असतो व त्याचे उत्पन्न परिणाम जास्त चांगले निघतात त्याचप्रमाणे कॅन्सर जर उशीरा लक्षात आला तर त्यावरचा उपचार महाग, लांब अवधीपर्यंत चालणारा, अधिक त्रासदायक ठरतो, इतकेच नाही तर अशा वाढलेल्या कॅन्सरचे परिणाम चांगले नसतात.

सारांश असा की कॅन्सर हा रोग गंभीर असला तरी त्यातून पूर्ण बरे होण्याची आशा असते. कॅन्सरला न घाबरता त्याला लढा द्यायला हवा. यात पहिले पाऊल म्हणजे व्यसनांना बळी न पडता कॅन्सर टाळणे. घरी कुणाला कॅन्सर असला, तर तो संसर्गजन्य नाही आणि अशा रुग्णांची व्यवस्थित काळजी घ्यायला हवी. आपण सगळे एकत्र होऊन कॅन्सरला लढा दिला त्यावर मात होणे अशक्य नाही. आपले ब्रीदवाक्य असावे 'कॅन्सर शीघ्र आढळल्यास तो पूर्णतः बरा होऊ शकतो'.



- कॅन्सर हा आज आपल्या समोर एक मोठा आरोग्य मुद्दा आहे.
- कॅन्सरची कारणे अनेक : आपल्या देशात तंबाखु आणि मद्यपान ही प्रमुख कारणे आहेत.
- कॅन्सरचे निदान लवकर झाल्यास तो पूर्णतः बरा होऊ शकतो.
- आधुनिक विज्ञानाने आज शस्त्रक्रिया रेडियोथेरपी अथवा केमोथेरपी अजून प्रभावकारी केली आहे, तरीही अतिशय वाढलेल्या किंवा उशीरा निदान झालेल्या कॅन्सरवर मात करणे अजूनही कठीण आहे.
- कॅन्सर हा संसर्गजन्य रोग नाही, कॅन्सर रुग्णांना शक्यतोवर मदत करायला हवी.

Warning Symptoms of cancer

If you come across any of the following symptoms, contact your doctor immediately.

- Sustained coughing.
- A lump in breasts, neck or anywhere in your body.
- A sudden change in voice.
- A sudden reduction in weight.
- Change in excretory routine.
- Bleeding.
- Wound or swelling in the mouth that is prolonged.

These could be the symptoms of cancer. Ifyou come across any of these, do not be afraid, seek medical advice immediately.

When to consult a cancer specialist?

If any of the symptoms mentioned above are identified, you may consult a cancer specialist to placate your doubts or contact your doctor.

Treatment of cancer.

Earlier operation was the only major form of treating cancer. Latest technological developments in the medical fields have resulted in discovery of several methods to treat cancer. Chemotherapy (medicines on cancer), Radiotherapy (Use of X-Rays), are prevalent since a long time however there has been continuous improvement and development in these technologies. In certain cases combined use of these treatments are prescribed. Medical developments have ensured that these treatments are less troublesome and vast majority of the patients undergo these treatments successfully. Today, chemotherapy and radiotherapy treats cancer more accurately than ever. Early detection of cancer makes the treatment quicker, cheaper and less severe and the results are excellent. Similarly late detection of cancer makes the treatment lengthy, costly and severe. Besides the results of this treatment are not very good.

To summarize, though cancer is a deadly disease there are chances of complete recovery. Cancer has to be fought fearlessly. First step in this direction is avoiding intoxicants like tobacco and alcohol. If any of your relatives at home is suffering from cancer than remember that it is not contagious and take proper care of such patients If we come together to fight this disease, then it is possible to overcome it. Our guiding principle in fighting cancer is early detection will result in complete cure.



- Cancer is one of the major health issues confronting us today.
- There are several causes f cancer. In India tobacco and alcohol are the major causes.
- If cancer is detected early, it can be cured completely.
- Modern science has made surgery, radiotherapy and chemotherapy more effective. However complete recovery is still difficult when cancer is detected at a later stage or when it has spread considerably.
- Cancer is not contagious and cancer patients should be helped in every possible way.

तोंडाचा कर्करोग

कॅन्सर हा आज आपल्यासमोर असलेल्या प्रमुख रोगांपैकी एक आहे. हा रोग वेगाने वाढत चालला आहे व यावर लवकरात लवकर जरूरी ती पाऊले उचलायला हवीत. विश्वभरात सुमारे तीन लाख नवीन तोंडाचे कॅन्सर दर वर्षी उद्‌भवतात, आणि त्यामुळे सुमारे १.२५ लाख रूग्ण दर वर्षी मरण पावतात. आपल्या देशात सगळया कॅन्सरपैकी तोंडाचा कॅन्सर हा सर्वात जास्त प्रमाणात आढळतो. भारतात पुरूषांमध्ये हा प्रथम क्रमांकाचा तर महिलांमध्ये हा तिसऱ्या क्रमांकाचा कर्करोग आहे. हया माहितीपुस्तिकेच्या माध्यमाने तोंडाचा कॅन्सर, त्याची कारणे, उपचार यावर माहीती पुरवण्याचा हेतु आहे.

कॅन्सर म्हणजे काय?

कॅन्सरच्या उद्‌भवण्यामागे काही विशिष्ट 'जीन' (अनुवांशिक सूक्ष्मरचना) मध्ये आलेले परिवर्तन असते. आपल्या शरीरातल्या कोशिका एका नियमित तऱ्हेने वाढत-मरत असतात. या नियमित चक्रात काही कारणे अडथळा आणू शकतात, ती म्हणजे शरीरातील दोषी 'जीन' अथवा शरीराच्या बाहेर असलेले कर्करोगजन्य पदार्थ (उदा. तंबाखू) एकदा ही सुरळीत रचना बिघडली तर, या रितीने परिवर्तित कोशिका (Cells) जास्त गतीने वाढायला लागतात आणि कॅन्सर निर्माण होतो. एकदा कर्करोग उद्‌भवला तर ज्याप्रमाणे वाळवी लाकडाला आतून पोखरून काढते त्याचप्रमाणे कर्करोग हा आपल्या शरीराला आतून पोखरून काढतो.

तोंडाच्या कॅन्सरची कारणे ः

शरीरातल्या विविध कॅन्सरपैकी तोंडाच्या कॅन्सरची कारणे आज आपल्याला ठामपणे लक्षात आली आहेत. निश्चितपणे माहीत असलेली कारणे पुढीलप्रमाणे आहेत ः

तंबाखू ः आज आपल्याला माहिती असलेल्या कारणांपैकी तंबाखू हा सगळयात धोकादायक कर्करोगजन्य पदार्थ आहे. तंबाखूमध्ये कॅन्सरला निश्चितरूप कारणीभूत असणारी रसायने असतात. तंबाखूचे सेवन विविधप्रकारे केले जाते; उदा.

- विडी/सिगारेट ओढणे (तंबाखूचे धुरावाटे सेवन)
- तंबाखू चघळणे
- पानामध्ये तंबाखू वापरणे
- मशेरी/खैनी/गुटखा यांत असलेली तंबाखू
- दातांना मशेरी लावणे

वरील कारणांपैकी तंबाखूयुक्त पदार्थाचे तोंडावाटे सेवन/चावणे हे आपल्या देशात तोंडातल्या कॅन्सरचे मुख्य कारण आहे. अर्थातच विडी/सिगारेट ओढल्यानेसुद्धा कॅन्सरचा धोका वाढतोच वैज्ञानिकांनी असे सिद्ध केले आहे की तंबाखू सेवनाने कॅन्सरचा धोका वाढतो. आपल्याला हे लक्षात घ्यायला हवे की कोणत्याही प्रकारे सेवन केलेली तंबाखू कॅन्सर घडवू शकतो.

Mouth Cancer

Cancer is one of the major diseases faced by us today. This disease is spreading very fast and therefore it is important to take the necessary steps as soon as possible. Throughout the world, every year approximately three lakhs new mouth cancer cases are diagnosed and every years approximately 1.24 lakhs patients die. In our country, cancer of the mouth has the maximum prevalence in all types of cancers. In India, this is the number one type of cancer for men, whereas in women this acquires the third position. The objective of this booklet is to provide information about mouth cancer, its causes and treatments.

What is cancer?

Cancer is caused due to transformation in some specific genes (hereditary micro compositions) . The cells in our body grow and die in a regular rhythm. Some reasons can obstruct this regular cycle, these are - the defective 'genes' in our body or cancerous substances outside our bodies (e.g. tobacco). Once this regular cycle is disturbed, then the transformed cells start increasing rapidly and cancer occurs. After the occurrence of cancer, this disease eats up our body from within, the way mites eat up the wood from within.

Causes for mouth cancer:

Today, out of various cancers that can occur in our body, we know definitely about the causes of mouth cancer. The definite causes are as follows :

Tobacco: Today, tobacco is the most dangerous substance known to us which causes cancer. Tobacco contains some chemicals which definitely cause cancer. Tobacco is taken inside the body in many ways, e.g.

- smoking bidi/ cigarette (partaking tobacco through smoke)
- chewing tobacco
- tobacco contained in masheri/ khaini / gutkha
- to apply masheri to the teeth

In our country, the main reason for mouth cancer is eating/ chewing substances which contain tobacco. Of course, by smoking a bidi/ cigarette the risk of cancer definitely increases. The scientists have proved that by eating tobacco the risk of cancer increases. We should understand that fact that tobacco taken inside our body in any form can cause cancer.

मद्यपान : अत्याधिक मद्यपान केल्याने सुद्धा तोंडाच्या कॅन्सरचा धोका वाढू शकतो. याबाबत हे सांगणे महत्वपूर्ण आहे की मद्यपान हे स्वतः जरी तोंडाच्या कॅन्सरला पूर्णतः कारणीभूत नसले तरी तंबाखू बरोबरच्या वापरामुळे कॅन्सर होऊ शकतो.

वायरस (विषाणू) : नवीन संशोधनात असे आढळून आले आहे की काही विशिष्ट विषाणू उदा. HPV हे तोंडाच्या कॅन्सरला जबाबदार असू शकतात. तरीही याबाबत बरेच संशोधन अजून सुरू आहे. आपल्या देशात हे कारण कमी महत्वाचे आहे.

सुपारी : अत्याधिक सुपारी खाण्याने तोंडात एक प्रकारचा विकार होतो जेणेकरून तोंड कमी उघडते; हा विकार कॅन्सरमध्ये परिवर्तीत होऊ शकतो.

तोंडाचे आरोग्य : असे आढळून आले आहे की दात व हिरडयांचे विकार तोंडाच्या कॅन्सरला कारणीभुत असू शकतात हे लक्षात घ्यायला हवे की तंबाखू सेवन हे तोंडाचे आरोग्य बिघडवण्यास भर घालते.

कॅन्सरची धोक्याची लक्षणे :

तोंडाचे कॅन्सर ओळखण्यासाठी काही महत्वाची लक्षणे पुढीलप्रमाणे :

- तोंडात अधिक काळापासून असलेले घाव/छाले/व्रण
- तोंड कमी उघडणे
- दात एकाएक हलणे /पडणे
- मानेत गाठ येणे
- तोंडातला रक्तस्त्राव

वरील लक्षणे कॅन्सरची असू शकतात व ती आढळल्यास घाबरू नये, तर त्वरीत वैद्यकीय सल्ला घ्यावा.

कॅन्सरचे प्रतिबंधन कसे?

शरीरातल्या विविध कॅन्सरपैकी तोंडातल्या कॅन्सरचे प्रतिबंधन हे मुख्यत्वे रूग्णावर अवलंबून आहे. कोणत्याही प्रकारच्या तंबाखू सेवनापासून दूर राहणे हाच एक कॅन्सरहून वाचण्याचा उपाय. तंबाखू कोणत्याही प्रकारे घेतली तरी ती धोकादायक आहे हे लक्षात ठेवायला हवे. जाहिरातींना बळी न पडता कोणतेही तंबाखूयुक्त पदार्थ उच्च दर्जाचे नसतात हे माहिती असावे. त्याचप्रमाणे दात/हिरडयांबद्दल काही विकार असतील तर त्यांचे निवारण करायला हवे.

कॅन्सर विशेषज्ञांकडे कधी जावे?

जर आपणास वरील सांगितलेली लक्षणे असतील, तर आपण शंका निवारण्यासाठी कॅन्सर विशेषज्ञांचा सल्ला घेऊ शकता. कॅन्सर अन्वेक्षण (screening) म्हणजे सामान्य जनतेत केल्या गेलेल्या तपासण्या जेणे करून लपलेले किंवा नवीन लहान कॅन्सर आढळून येतील. तोंडाच्या कॅन्सरवर सर्वात चांगले अन्वेक्षण म्हणजे वैद्यकीय तंज्ञाने केलेले निरीक्षण हे सांगणे महत्वाचे की असे अन्वेक्षण जरी समाजात नियमीतपणे होत नसले तरी, जर आपल्या जवळ कुठे अन्वेक्षण (screening) कार्यक्रम होत असेल तर त्यात अवश्य भाग घ्यावा.

कॅन्सरचे उपचार :

पूर्वी कॅन्सरवर शस्त्रक्रिया (ऑपरेशन) हा प्रमुख उपचार होता. आधुनिक वैद्यकिय प्रगती झाल्याने आज उपचारासाठी आणखी पर्याय आले आहेत, सांगायचे झाले तर केमोथेरपी (कॅन्सरवरची औषधे) आणि रेडियोथेरपी (क्ष किरणांनी उपचार) ही दोन्ही साधने बरीच वर्षापासून आहेत, आणि यांच्यामध्ये सतत सुधारणा आणि विकास होतो आहे. तोंडाच्या कॅन्सरवर प्रामुख्याने शस्त्रक्रिया करावी लागते, पण काही परिस्थीत शस्त्रक्रिया, रेडियोथेरपी व केमोथेरपी यांचा संयुक्त वापर करावा लागतो. विज्ञानाच्या सतत प्रगतिने आज हे सर्व पर्याय कमी त्रासदायक झालेले आहेत व जास्तीत जास्त रूग्ण हे उपचार सहन करू शकतात. गेल्या दोन दशकात अवयव वाचविणाऱ्या उपचार पद्धतीवर जोर आलेला आहे, जेणेकरून एखाद्या अवयव न काढता कॅन्सर बरा करता येईल. परंतु असे उपचार काही विशिष्ट कॅन्सर किंवा विशिष्ट रूग्णांमध्येच शक्य असतात. कॅन्सरचे निदान आधी झाल्यास त्याचा उपचार थोडक्यात आटोपणारा, स्वस्त, कमी त्रासदायक असतो व त्याचे परिणाम जास्त चांगले निघतात त्याचप्रमाणे कॅन्सर जर उशीरा लक्षात आला तर त्यावरचा उपचार महाग, लांब अवधीपर्यंत चालणारा, अधिक त्रासदायक ठरतो, इतकेच नाही तर अशा वाढलेल्या कॅन्सरचे परिणाम चांगले नसतात.

सारांश असा की तोंडाचा कॅन्सर हा रोग निश्चित गंभीर असला तरी त्यातून पूर्ण बरे होण्याची आशा असते. कॅन्सरला न घाबरता त्याच्याशी लढा द्यायला हवा. यात पहिले पाऊल म्हणजे तंबाखूच्या व्यसनांना बळी न पडणे. घरी कोणाला तोंडाचा कॅन्सर असला, तर तो संसर्गजन्य नाही आणि अशा रूग्णांची व्यवस्थित काळजी घ्यायला हवी. आपण सगळे एकत्र होऊन कॅन्सरला लढा दिला तर त्यावर मात करणे अशक्य नाही. आपले ब्रीदवाक्य असावे 'कॅन्सर शीघ्र आढळल्यास तो पूर्णतः बरा होऊ शकतो'.

लेखक : डॉ. आर. ए. बडवे
संचालक, टाटा मेमोरियल सेंटर, मुंबई.

- तोंडाच्या कॅन्सरचे मुख्य कारण तंबाखू सेवन आहे.
- तंबाखूला बळी न पडणे हाच एक कॅन्सर प्रतिबंधनाचा उपाय.
- कॅन्सरचे निदान लवकर झाल्यास तो पूर्णतः बरा होऊ शकतो.
- आधुनिक विज्ञानाने आज शस्त्रक्रिया रेडियोथेरपी व केमोथेरपी अजून प्रभावकारी केली आहे, तरीही अतिशय वाढलेल्या किंवा उशीरा निदान झालेल्या कॅन्सरवर मात करणे अजूनही कठीण आहे.
- कॅन्सर हा संसर्गजन्य रोग नाही; कॅन्सर रूग्णांची व्यवस्थीत काळजी घ्यायला हवी.

Alcohol : Excessive drinking of alcohol also can increase the risk of mouth cancer. Here it is important to note that drinking alcohol alone may not be the entire cause of mouth cancer but if it is accompanied by tobacco then it may cause cancer.

Virus : Recent research has shown that some specific viruses , e.g. HPV may be responsible for causing mouth cancer. However, a lot of research is still going on about this . In our country, this cause is of less importance.

Betel nut : If betel nut is eaten excessively, then it causes a type of disease inside the mouth, due to which the mouth cannot be opened properly. This disease can transform into cancer.

Mouth hygiene : It is observed that the diseases of teeth and gums can cause cancer. We should note that eating tobacco further deteriorates the heath of mouth.

Danger signals for cancer:

Important symptoms for identifying mouth cancer, are as follows :

- chronic ulcers/wounds in the mouth
- mouth not opening properly
- teeth becoming loose/ coming out suddenly
- tumour in the neck
- bleeding in the mouth

The above can be symptoms of cancers. Do not panic if such symptoms are observed. Contact your doctor immediately.

How to prevent cancer?

Out of the various cancers that can occur in our body, the prevention of mouth cancer largely depends on the patient himself. The only remedy for saving yourself from cancer is staying away from all forms of tobacco. We should remember that tobacco is dangerous in any of its forms. Without falling prey to the advertisements that may advocate on the contrary, we should know that any substances that contain tobacco cannot be of good quality. Also, if there are any diseases of teeth/gums these have to be remedied.

When should we approach a cancer specialist?

If you have the symptoms mentioned above, then you may consult a cancel specialist. Cancer screening means the tests carried out on general public to find out any hidden or new small cancers. In case of mouth cancer, the best screening is the one done by a medical expert. Though such screening tests are not regularly carried out for the general public, if there are any such screenings being carried out in your neighbourhood, please participate in such tests.

Treatments for cancer:

In the past, operation was a major treatment for cancer. Due to the advancements in the medical field, there are many other options available today, such as chemotherapy (medicines on cancer) and radiotherapy (treatments with X-rays) are being used for many years, and there have been continuous improvements and developments in these. The main treatment for mouth cancer is that of an operation but in some cases a combination of operation, radiotherapy and chemotherapy has to be used. Due to the advancements in technology, today all these options are less painful and most of the patients can tolerate these treatments. During the last two decades, the major emphasis has been on treatments such that the organs can be saved and the cancer can be treated without removing organs. However, such treatments are possible only for some types of cancers or for some patients only. If cancer is diagnosed early, then its treatment is short, less expensive, less painful and the effects of such treatment are better, whereas if the cancer is diagnosed at a later stage, then its treatment is costly, prolonged and more painful, and the effects of such cancer in an advanced stage are not good.

To summarise, though cancer of the mouth is definitely a serious disease, the patient can hope to be completely cured. One should fight cancer, without dreading it. The first step towards this is not to indulge in vices involving tobacco. If any of your family members have mouth cancer, it is not contagious and these patients should be cared for properly. If all of us come together and fight cancer, then it will not be difficult to conquer it. Our motto should be ' Cancer can be completely cured, if diagnosed immediately.'.

Author : Dr. A. R. Badve,
Director, Tata Memorial Centre, Mumbai

- The main cause of mouth cancer is eating/chewing tobacco.
- The only way to prevent cancer is not to indulge in eating/ chewing tobacco
- If cancer is diagnosed early, it can be completely cured.
- Today, the modern medicine has made operation, radiotherapy and chemotherapy treatments more effective. However, conquering a cancer which has grown very much or diagnosed at a later stage is still very difficult.
- Cancer is not a contagious disease; the cancer patients need to be cared for well.

स्तनाचा कर्करोग

स्तनाचा कॅन्सर स्त्रियांमध्ये सर्वात जास्त प्रमाणात आढळणारा कॅन्सर आहे. यावरून असा अनुमान लावला जाऊ शकतो, की जर स्तनाचा कॅन्सर लवकर आढळला व त्यावर त्वरित उपचार केला गेला तर रूग्ण संपूर्णपणे कॅन्सर मुक्त होण्याची संभावना अधिक आहे. भारतात शहरात राहणाऱ्या महिलांमध्ये स्तनाचा कॅन्सर होण्याची धोक्याची संभावना २२ मधून १ आहे, व ग्रामीण महिलांमध्ये हे प्रमाण ६४ मधून १ आहे. जरी हे प्रमाण पाश्चात्य देशांपेक्षा कमी असले तरी हे काळजीचे कारण आहे व त्यावर सर्वोत्तम उपाय म्हणजे जागरूकता व लवकरात लवकर उपचार हे आहे.

साधारणत स्तन कॅन्सर स्तनातून दूध उत्पन्न करणाऱ्या भागातून उद्भवतो व त्याची गाठ बनते. कॅन्सरच्या कोशिकांमध्ये रक्ताद्वारे (किंवा Lymphatic द्वारे) स्तनातून शरीराच्या अन्य भागांमध्ये पसरण्याची क्षमता असते.

टाळण्याजोगी व अटळ कारणे

स्तनाचा कॅन्सर होण्यामागे अनेक कारणे असू शकतात, यामधील काही कारणे आहेत जीवनपद्धती व काही जीवशास्त्रशी संबंधित आहेत. DNAमध्ये रचलेल्या काही प्रकृती असतात ज्यावर नियंत्रण करता येत नाही. इतर कारणांवर नियंत्रण साधून स्तनाच्या कॅन्सरचा धोका कमी केला जाऊ शकतो.

अटळ कारणे ः

- **अनुवांशिक कारणे ः** एका परिवारातील व्यक्तीला जर कधी स्तनाचा कॅन्सर झाला असेल तर त्या परिवारातील इतर महिलांमध्ये स्तनाचा कॅन्सर होण्याचा अधिक धोका आहे. जर तुमची आजी, आई, बहीण, किंवा मुलगी स्तन कॅन्सर पीडित असतील तर तुम्ही अधिक धोका असलेल्या गटात सामील मानल्या जाल. काहीही विपरीत लक्षणे आढळल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्या.
- **वय ः** जसे स्त्री चे वय वाढते तसे स्तन कॅन्सरचा धोका वाढतो. स्तन कॅन्सर पीडित महिला बहुत करून ४० वर्षाहून अधिक वयाच्या असतात किंबहुना तरूण महिलांमध्ये देखील स्तन कॅन्सरचे प्रमाण हल्ली वाढत आहे.
- **गर्भाशी अथवा मासिक पाळीशी संबंधित कारणे ः** ज्या स्त्रियांना पहिली पाळी १२ वर्षाच्या आधी आली किंवा ४४ वर्षापर्यंत थांबली नाही व/अथवा ज्यांना कधी गर्भ राहिला नाही, त्या स्त्रियांना स्तन कॅन्सर होण्याचा अधिक धोका आहे.

टाळण्याजोगी कारणे ः

- **वजन ः** ज्या स्त्रियांचे वजन फार जास्त असते त्यांना स्तन कॅन्सर होण्याचा अधिक धोका आहे. आठवडयातून ४ तास व्यायाम करण्याने हा धोका कमी केला जाऊ शकतो. व्यायामाने शरीरात estrogen चे प्रमाण कमी होते व रोगप्रतिबंधक शक्ती वाढते.
- **धुम्रपान ः** बहुतेकांना हे माहित आहे की धुम्रपानाने फुफुसांचाकॅन्सर होतो, पण यामुळे स्तन कॅन्सरचा धोका देखिल वाढतो. हल्ली एका अभ्यासात या संबंधित संकेत आढळला आहे. धुम्रपान अथवा अप्रत्यक्ष धुम्रपानाचा स्तन कॅन्सर या संबंधी अभ्यास सुरू आहेत. तरीही, जर आपण स्तन कॅन्सर पीडित असलात तर धुम्रपान केल्याने तुमच्या आयुष्याचा कालावधी कमी होऊ शकतो.
- **मद्यपान ः** जास्त प्रमाणात मद्यपान, म्हणजे दिवसातून एकदा यापेक्षा जास्त केल्याने स्तन कॅन्सरचा धोका वाढतो. काही अभ्यासांत असे आढळले आहे की मद्यपान केल्याने स्तन कोशिकांचा संसर्ग estrogen शी जास्त प्रमाणात होतो. यामुळे स्तन कोशिकांना कॅन्सर कोशिकांमध्ये परिर्वतीत होण्यास उत्तेजन मिळते. जितके जास्त तुम्ही मद्यपान कराल तितका धोका वाढेल.
- **आहार ः** कमी चरबी असलेला पैष्टिक आहार द्यावा. अधिक चरबी असलेल्या आहाराने स्तन कॅन्सरचा धोका वाढतो. याने estrogen चे प्रमाण वाढते व त्याद्वारे कॅन्सरला वाढण्यास उत्तेजन मिळते. आपल्या आहारात भरपूर प्रमाणात फळे व भाज्या यांचा समावेश करावा.

स्तनाचा कॅन्सरची कारणे

Breast Cancer

In women, the cancer with the highest prevalence is breast cancer. From this, it can be deducted that if the breast cancer is diagnosed early and treated immediately, then there is greater possibility of the patient becoming totally cancer-free. In India, the risk of cancer for urban women is 1 out of 22 , whereas for rural women the ratio is 1 out of 64. Even though this ratio is less than that observed in the western countries, still this is a cause for worry and the best remedy would be awareness and treatment as soon as possible.

Generally, the breast cancer originates in the milk producing glands in the breasts and forms a tumour. It can spread through the cancerous cells in the blood (or through the lymphatic) from the breast to other parts of the body.

Avoidable and unavoidable reasons:

There are many reasons that cause cancer, some are related to the life style and some are related to biology. Some features are based on the DNA which cannot be controlled. Other causes can be controlled to reduce the risk of cancer.

Unavoidable reasons:

- **Hereditary reasons:** If in one family, a person has suffered from breast cancer then there is more risk for other women in that family from breast cancer. If your grand mother, mother, sister or daughter suffers from breast cancer, then you will be categorised as having greater risk. If you observe any undesirable symptoms, then contact the doctor immediately.
- **Age :** As the age of a woman increases, the risk of breast cancer increases. Mostly, the women suffering from breast cancer are in the age group of 40 plus, however nowadays the prevalence of breast cancer in younger women is increasing.
